सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.१७२ ठ. क्र. १९६
दि. २७/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील राहणारे श्री. अ. समद मो. रफिक शेख ४३ वर्षे रा. २ नं. झोपडपट्टी सोलापूर यांना मेंदूचा विकार झालेला आहे. या रुग्णाचे एम.पी.न्युरो सायन्स (वळसंगकर हॉस्पीटल) सोलापूर येथे उपचार चालू असून त्यांना रक्कम रु. ५,७०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख सत्तर हजार फक्त) इतका खर्च आहे. सदर रुग्णाची आर्थिक परिस्थिती गरिबीची असून एकूण पाच जणांचे कुटूंब आहे. त्या परिवाराची पालन-पोषणाची जबाबदारी सर्वस्वी या रुग्णावरच अवलंबून आहे. तरी त्यांच्या उपचारासाठी (मेंदू विकार) आपल्या महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगो~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १५५ ठ. क्र. १८५
दि... १५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र. २२ अ मध्ये अशोक चौक येथील पोलीस हेडक्वॉर्टर समोरील चौकास **शिवराम चौक** असे नामकरण करण्यांस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~सामुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १८५ ठ. क्र. १९५
दि. १८/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २० ब, आशा नगर प्रिसिजन फॅक्टरी ते लोकमंगल हॉस्पीटलच्या पाठीमागील बाजूपासून ते नेताजी शाळेलगत ते माळी नगर नाल्यापर्यंत सदर नाला सध्या नादुरुस्त अवस्थेत असून व्यवस्थितरित्या पाण्याचा निचरा न होता पाणी संपूर्ण भागामध्ये अस्ताव्यस्त पसरत असून, तेथील परिसरात दुर्गंधीयुक्त अनारोग्य वातावरण निर्माण झालेले असून, यामुळे रोगराई वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या विचार करता व सद्यस्थितीत तेथे असलेल्या नाल्यामधून पाणी व्यवस्थितरित्या वाहून जाणे सोयीस्कर व्हा या दृष्टीकोनातून नाला ट्रेनिंग करणेकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस व येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~चालू~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १४६ ठ. क्र. १९९
दि. १७/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र. ३७ मधील भावनाऋषी पटांगण (पंचमुखी हनुमान लगत, डब्ल्युआयटी जुने कॉलेज समोर) मोकळे मैदान विकसीत करणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र. सन २०१६-१७ र.रु. २६,३९,९३३/- यांस व उपरोक्त नमूद प्रमाणे बजेट तरतूद होऊन पूर्वगणनपत्रकास मा. स्थापत्य समितीची सक्षम मान्यता मिळून त्यांस अंतीम मंजूरी मिळणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १३-७-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १७३, दि. १-८-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील शहरातील बागांचे सुशोभिकरण करणे, सुधारणा करणे व नविन बाग करणे या तरतूदीतून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १५६८ ठ. क्र. २००
दि. १८/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र. १९-ब येथील किर्ती नगर, साई नगर, पुजारी वस्ती या ठिकाणी पाण्याचे मुख्य पाईपलाईनचे काम झाले असून घरगुती नळाचे कनेक्शन देण्याकरिता सदर ठिकाणी ६ इंची पाईप लाईन घालणे अत्यंत गरजेचे आहे. सदरचे पाईप लाईनचे काम झाल्यास या भागातील टँकरची संख्या कमी होऊन नागरिकांची सोय होणार आहे. तरी सदर कामासाठी सन २०१६-१७ मधील भांडवली कामे पान क्र. ४ अनु.क्र. ८ पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे या बजेट सदरातून रक्कम रु. २५ लाख देण्यास व सदरचे काम तात्काळ हाती घेण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.9EL..ठ. क्र. 209
दि. 9७/90/9E रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १४ ब मध्ये सोलापूर जुने विठ्ठल मंदिर ते वसंत कॅप फॅक्टरी पर्यंतच्या मार्गास **वे.शा.सं.भागवताचार्य दिनकरपंत गवई मार्ग** असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे नामपलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका